# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६२ दिनांक २६/०६/२०२१

## वाडा पोलीस ठाणे येथील खुनाच्या गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखा,बोइसर यांना यश

दिनांक ११/०६/२०२१ रोजी ०४-०० वाजेच्या पुर्वी सापने येथे फिर्यादी याचे राहते घरात यातील फिर्यादी व मयत नामे सुप्रिया गुरुनाथ काळे, वय ४५ वर्षे रा.सापने खुर्द,ता.वाडा,जि.पालघर हे नात्याने मुलगा व आई असुन यातील मयत ही आपल्या राहत्या घराचे हॉलमध्ये झोपली असतांना कोणत्या तरी अज्ञात इसमांनी किचनच्या स्लाईडगीचे खिडकी वाटे आत प्रवेश करुन मयत हिचे डावे बाजुस कानाचे खाली कोणत्यातरी धारदार हत्याराने वार करुन जिवे ठार मारुन तीचे कानातील सोन्याची कर्ण फुले, मंगळ सुत्र व एक मोबाईल असा एकुण ६२,०००/- रुपयाचा माल चोरी करुन नेला म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे गाभीर्य लक्षात घेवुन मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर व मा.श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री.प्रशांत परदेशी, उपविभागिय पोलीस अधिकारी जव्हार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि आसीफ बेग, वाडा पोलीस ठाणे व पोउनि आशिष पाटील, स्थानिक गुन्हे शाखा,बोइसर यांची वेगवेगळी तपास पथके तयार करुन, सदर पथकास तपासकामी सुचना व मार्गदर्शन करुन तपास पथके वेगवेगळ्या परिसरात रवाना केलेली होती. सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारचे धागेदोरे नसतांना कौशल्यपुर्ण गुन्हयाचा तपास करुन पोउनि आशिष पाटील, स्थानिक गुन्हे शाखा,बोइसर व त्यांचे पथकाने सदर गुन्हयात एक आरोपीत वय ३५ वर्षे रा.कर्जुन, ता.वसई जि.पालघर यास अटक करुन त्याचेकडु कसुन चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिलेली आहे.

सदरची कामगिरी ही मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर व मा.श्री.प्रकाश गायकवाड,अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री.प्रशांत परदेशी, उपविभागिय पोलीस अधिकारी जव्हार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुधीर संखे, प्रभारी अधिकारी वाडा पोलीस ठाणे, सपोनि आसीफ बेग, वाडा पोलीस ठाणे, पोउनि आशिष पाटील, स्थानिक गुन्हे शाखा,बोइसर व पोलीस अंमलदार यांनी केलेली आहे.

Scanned with CamScanner